महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २०८ वे | दिनांक : २२/०७/२०२६ | वार : बुधवार

## मंत्रिमंडळाचा मोठा निर्णय: १७७ तालुक्यांना प्रत्येकी ५ कोटींचा निधी



**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी (२१ जुलै, २०२६) पार पडलेल्या महत्त्वाच्या बैठकीत विविध क्षेत्रांशी संबंधित अनेक धोरणात्मक आणि महत्त्वपूर्ण निर्णयांना मान्यता देण्यात आली आहे. विदर्भातील कृषी संशोधनाला चालना देण्यापासून ते आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यापर्यंत आणि मागास तालुक्यांच्या विकासासाठी निधी मंजूर करण्यापर्यंतच्या विविध प्रस्तावांना या बैठकीत हिरवा कंदील दाखवण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या प्रमुख निर्णयांचा सविस्तर आढावा खालीलप्रमाणे:

विदर्भातील शेतकरी आणि कृषी क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी मंत्रिमंडळाने अत्यंत दिलासादायक निर्णय घेतला आहे. नागपूर जिल्ह्यातील काटोल येथे नवीन शासकीय उद्यानविद्या महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

हे महाविद्यालय अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाशी संलग्न असेल आणि यात दरवर्षी १२० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. या निर्णयामुळे विदर्भातील सर्व ११ जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना फायदा होणार असून फळे, भाजीपाला, फुले यांचे उत्पादन, फळप्रक्रिया आणि मूल्यवर्धन या विषयांवर उच्च दर्जाचे संशोधन व अभ्यासाला चालना मिळणार आहे. या महाविद्यालयाच्या कामकाजासाठी ५१ नियमित पदांच्या निर्मितीलाही मान्यता देण्यात आली आहे.

राज्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक सक्षम आणि वेगाने कार्यरत राहावी यासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाला (NDRF) पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील मौजे सदुंबरे येथे तीन हेक्टर जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या जागेवर एनडीआरएफचा कायमस्वरूपी तळ उभारला जाणार आहे. या तळाच्या माध्यमातून जवानांचे नियमित प्रशिक्षण आणि राज्यातील आपत्कालीन परिस्थितीत तातडीने व प्रभावीपणे बचाव कार्य राबवणे सोपे होणार आहे.

राज्यातील ग्रामीण आणि मागास भागाचा समतोल विकास साधण्यासाठी 'आकांक्षित तालुका कार्यक्रम' राबवण्यास मंजुरी देण्यात आली आहे. राज्यातील १७७ आकांक्षित तालुक्यांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी हा उपक्रम राबवला जाईल.

या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक तालुक्याला विकासात्मक कामांसाठी ५ कोटी रुपयांचा विशेष निधी उपलब्ध करून दिला जाईल. सन २०२७-२८ मध्ये या तालुक्यांमधील कामांचे मूल्यांकन केले जाईल आणि उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तालुक्यांना राज्य सरकारकडून पुरस्कार देऊन सन्मानित केले जाईल.

महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम २०२३ च्या अंमलबजावणीमुळे लोक आयुक्तांच्या अधिकार क्षेत्रात मोठी वाढ झाली आहे. ही वाढीव जबाबदारी प्रभावीपणे पार पाडण्यासाठी लोक आयुक्त कार्यालयातील १४३ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात आली आहे. मनुष्यबळात वाढ झाल्याने भ्रष्टाचाराविरोधातील तक्रारींचा निपटारा अधिक गतीने होण्यास मदत होईल.

अमरावती जिल्ह्यातील मोझरी येथील अखिल भारतीय श्रीगुरूदेव सेवामंडळ यांच्या नागपूरमधील सुभाष रोडवरील जागेच्या भाडेपट्ट्याच्या (Lease) नूतनीकरणावर आकारण्यात येणारे मुद्रांक शुल्क (Stamp Duty) पूर्णपणे माफ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महसूल विभागातर्फे घेण्यात आला आहे. (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग)

## दिल्ली लाठीहल्ल्यात नागपूरचा भरत बानाईत चर्चेत

**नागपूर :** 'नीट' (NEET) पेपरफुटीच्या निषेधार्थ आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टीने (CJP) जंतरमंतर येथे पुकारलेल्या 'संसद मार्च' आंदोलनाला सोमवारी हिंसक वळण लागले. यावेळी पोलिसांनी आंदोलकांवर केलेल्या अमानुष लाठीचार्जमध्ये नागपूरचा २७ वर्षीय पदवीधर तरुण भरत बनाईत हा पोलिसांच्या मारहाणीचा सामना करतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे. या घटनेवर भारतच्या कुटुंबीयांनी तीव्र संताप व्यक्त करत सरकारला धारेवर धरले आहे.

संसद मार्चदरम्यान परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्याचे सांगत पोलिसांनी जंतरमंतरवर लाठीचार्ज सुरू केला आणि आंदोलकांचे तंबू हटवले. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये, सुमारे १५ ते २० सुरक्षा कर्मचाऱ्यांनी (RAF) एका तरुणाला घेरले असून ते त्याला अमानुषपणे लाठ्यांनी मारत असल्याचे दिसत आहे. एवढी मारहाण होऊनही तो तरुण न डगमगता "मारो सर..." असे ओरडत पोलिसांच्या लाठ्या-काठ्या झेलत असल्याचे दिसते. अखेर हातात तिरंगा घेतलेल्या एका महिला पोलिसाने हस्तक्षेप करत त्याला तेथून बाजूला काढले.

या तरुणाचे नाव भरत बानाईत असून तो नागपूरचा रहिवासी आहे. भरत एम.कॉम. झालेला आहे. तो सीजेपीच्या (CJP) सुरुवातीच्या समर्थकांपैकी एक असून या आंदोलनासाठी तो नागपूरहून दिल्लीला गेला होता. डोक्यातून रक्त भळभळत असताना भरतने माध्यमांशी संवाद साधला. "माझ्या डोक्यावर आणि शरीराच्या प्रत्येक इंचावर मार बसला आहे. हे विद्यार्थ्यांचे आंदोलन असून त्यावर सरकारने केलेली कारवाई अत्यंत निषेधार्ह आहे. या देशात लोकशाही संपली असून आपली वाटचाल हुकूमशाहीकडे सुरू आहे. आम्ही आतंकवादी नाही. मला आता अशा देशात जगण्यात अर्थ राहिलेला नाही. काठीने मारण्यापेक्षा मला थेट गोळीच घालून मारून टाका," असा उद्विग्न सवाल भारतने उपस्थित केला. तसेच, "मी स्वतः हिंदू असूनही माझ्यावर असा हल्ला करण्यात आला," असेही तो म्हणाला.

पोलिसांच्या कारवाईनंतर सुरक्षित स्थळी हलवण्यात आलेला भारत म्हणाला, "२० जुलै हा माझ्या आयुष्यातील काळा दिवस राहील. हा त्रास मला नेहमीच या संघर्षाची आठवण करून देईल."

भरतला झालेल्या अमानुष मारहाणीचा व्हिडिओ पाहून नागपुरात असलेले त्याचे आई-वडील अत्यंत व्यथित झाले. आई विनता बनाईत म्हणाल्या, "माझ्या मुलाला ज्या पद्धतीने पकडून-पकडून आणि दोन-दोन वेळा मारहाण करण्यात आली, ती अत्यंत चुकीची आहे. तो नागपुरातही अभिजीत दीपके यांच्या आंदोलनात सहभागी झाला होता. व्हिडिओ पाहून मला रडू कोसळले."

## उद्या शेतकरी कर्जमाफीची पहिली यादी; NEET आंदोलनात स्वार्थी घटक घुसल्याचा फडणवीसांचा आरोप

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पत्रकार परिषदेत शेतकरी कर्जमाफी, अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित प्रदर्शन आणि दिल्लीतील सुरू असलेल्या आंदोलनांवर भूमिका मांडली. उद्या शेतकरी कर्जमाफीची प्राथमिक यादी जाहीर करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच, लोकशाहीत आंदोलनाचा अधिकार असला तरी हिंसा आणि अराजकता खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. मुख्यमंत्री म्हणाले की, शेतकरी कर्जमाफीच्या अंमलबजावणीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून उद्याच (22 जुलै) प्राथमिक लाभार्थी यादी जाहीर करण्याचा प्रयत्न सुरू आहे. सहकार विभागाने यासाठी आवश्यक तयारी केली असून, अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधत ही यादी प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यावेळी फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन केल्याची माहिती दिली. या प्रदर्शनात त्यांच्या बालपणापासून राजकीय आणि सामाजिक प्रवासातील विविध क्षण छायाचित्रांच्या माध्यमातून मांडण्यात आले आहेत. अजित पवार यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचा उमदा स्वभाव, हास्य आणि नेतृत्वगुण या प्रदर्शनातून अनुभवता येतात. दादांवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाने हे प्रदर्शन पाहावे, असे आवाहन त्यांनी केले. दिल्लीतील आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, लोकशाहीत प्रत्येकाला आंदोलन करण्याचा अधिकार आहे. मात्र, संविधानाने दिलेल्या अधिकारांसोबत जबाबदाऱ्यांचाही विचार केला पाहिजे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २२ जुलै २०२६


## 'तंत्रज्ञानाने सक्षम पिढीच घडवेल उद्याचा भारत!'



*इकरा पब्लिक स्कूलचा हायटेक उपक्रम: अत्याधुनिक AC संगणक लॅब आणि तज्ज्ञ IT शिक्षकासह MSCIT चा शुभारंभ*

**मोहाडी (प्रतिनिधी) :** विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल साक्षरतेला चालना देण्यासाठी इकरा पब्लिक स्कूल, मोहाडी येथे MSCIT आणि विविध शॉर्ट टर्म कोर्सेसचा शानदार शुभारंभ करण्यात आला आहे.बदलत्या युगाच्या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना आता पारंपरिक शिक्षणासोबतच AI (आर्टिफिशियल इंटेलिजन्स), कोडिंग आणि टायपिंग यांसारख्या अत्याधुनिक कौशल्यांचे धडे शाळेतच दिले जात आहेत. या उपक्रमासाठी शाळेत सर्व सोयी-सुविधांनी युक्त अशी अत्याधुनिक, हायटेक आणि वातानुकूलित (AC) संगणक प्रयोगशाळा तयार करण्यात आली असून, विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे सखोल व व्यावहारिक ज्ञान मिळावे यासाठी एका विशेष आयटी (IT) तज्ज्ञ शिक्षकाची नियुक्ती करण्यात आली आहे.शाळेच्या या स्तुत्य उपक्रमाबद्दल आनंद व्यक्त करत संस्थेचे अध्यक्ष डॉ.अ.करीम सालार यांनी शाळा व्यवस्थापन, शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. या प्रसंगी बोलताना ते म्हणाले की, विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न ठेवता त्यांना संगणक आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान देणे अत्यंत गरजेचे आहे,तरच आपला देश खऱ्या अर्थाने महासत्ता बनेल. शाळेच्या या दूरदृष्टीपूर्ण निर्णयाचे सर्वच स्तरातून कौतुक होत असून पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत आहे.

## नामांतर शहीद स्मारकाच्या निकृष्ट कामावर कारवाई; सात दिवसांत पाडून नव्याने उभारण्याचे आदेश



**छत्रपती संभाजीनगर :** विद्यापीठ गेटच्या बाजूला शासनाच्या निधीतून तयार होत असलेल्या नामांतर शहीद स्मारकाच्या कामाला सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता श्री एस एस भगत साहेब यांनी स्वतःआणि त्यांचे उपअभियंता श्री ढाकणे व शाखा अभियंता आणि संबंधित कामाचा जातीवादी व भ्रष्टाचारी शासकीय कंत्राटदार रोहित नावंदर व पूजनीय भिकू संघ त्यांच्या समक्ष नामांतर शहीद स्मारकाची पाहणी केली असता त्या कामांमध्ये अनेक चुका आढळल्यामुळे अधीक्षक अभियंता भगत साहेब यांनी निकृष्ट दर्जाचे बांधकाम तात्काळ पाढण्याचे आदेश दिले आहेत आणि शासकीय कंत्राटदाराला सात दिवसांच्या वेळेत हे पूर्ण काम तोडून उत्कृष्ट दर्जाचे बनवण्याचे आदेश केले आहे अन्यथा शासकीय कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्याचे व दिलेली रक्कम वसुलीचे ठामपणे सांगितले आहे.तरी हे ऐतिहासिक नामांतर शहीद स्मारकाचे बोगस निकृष्ठ दर्जाचे काम करणाऱ्या संबंधित ठेकेदाराने हे काम सकाळी पाडले नाही तर संबंधित शासकीय कंत्राटदार व अधिकारी यांच्यावर कायदेशीर कडक कारवाई करण्यात यावी.नसता आं◌ंबेडकरी चळवळीच्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गेट समोर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशारा आं◌ंबेडकरी संघटनांनी दिला आहे यावेळी पूजनीय भंन्ते संघप्रिय थेरो, भंन्ते बोधि धम्मो, भंन्ते आनंद, प्रांतोष भाऊ वाघमारे, दिपक निकाळजे, अमित वाहुळ, राहुल वडमारे.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २२ जुलै २०२६


## बहरला गुलमोहर

लाल केशरी रंगांनी
बहरला गुलमोहर
रस्त्याच्या कडेला
दिसतो किती सुंदर

उन्हाच्या कळा सोसूनी
देतो गार छाया
सर्वांवर करतो तो
जीवापाड माया

लाल केशरी रंगांनी
झाला छान साकार
निसर्गाने बहाल केला
जणू छत्रीचा आकार

भटकंती करून पक्षी
रात्रभर विसावा घेती
मायेचा ओलावा देऊन
गुलमोहर जपतो नाती

उन पावसात गुलमोहर
ताठ मानेनं उभा
आपणास सांगतो जणू
संकटाशी लढत जगा



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## ७१ फळझाडांची कत्तल पाच वर्षांची मेहनत एका रात्रीत उध्वस्त



**दैलताबाद (जावेद अहमद) :** गंगापूर तालुक्यातील मौजे तळेसमान येथील गट क्रमांक ५७ मधील एका शेतकऱ्याच्या हिस्स्यातील तब्बल ७१ फळझाडे अज्ञात व्यक्तींनी तोडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.माळीवाडा येथील रहिवासी जगन्नाथ भानुदास मुळे यांनी याबाबत दौलताबाद पोलीस ठाण्यात लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, तळेसमान येथील त्यांच्या हिस्स्यातील शेतात सुमारे पाच वर्षांपूर्वी लावलेली ३५ आंब्याची, ३३ मोसंबीची आणि ०३ जांभळाची, अशी एकूण ७२ फळझाडे अज्ञात व्यक्तींनी जाणीवपूर्वक तोडून टाकली.तक्रारीत म्हटले आहे की, १९ जुलै २०२६ रोजी सायंकाळी सुमारे पाच वाजता शेतात फेरफटका मारण्यासाठी गेल्यानंतर हा प्रकार निदर्शनास आला. गेल्या पाच वर्षांपासून या झाडांची नियमित मशागत, सिंचन, खत व औषध फवारणी करून जोपासना करण्यात आली होती. मागील दोन वर्षांपासून झाडांना फळधारणा सुरू झाली होती. त्यामुळे झाडे तोडल्याने मोठे आर्थिक नुकसान होण्याबरोबरच मानसिक धक्काही बसल्याचे मुळे यांनी तक्रारीत नमूद केले आहे.दरम्यान, तक्रारीनंतर महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. पंचनाम्यात संबंधित शेतात ३५ आंबा, ३३ मोसंबी आणि ०३ जांभूळ अशी एकूण ७१ फळझाडे तोडण्यात आल्याची नोंद करण्यात आली आहे. मात्र ही घटना नेमकी कोणी आणि कोणत्या कारणातून केली, हे अद्याप स्पष्ट झालेले नसून याचा तपास सुरू आहे.शेतकरी जगन्नाथ मुळे यांनी घटनास्थळाचा सविस्तर पंचनामा करून अज्ञात व्यक्तींचा शोध घ्यावा, नुकसानाचा अहवाल तयार करून दोषींविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी पोलिसांकडे केली आहे.

## लेखक आणि शिक्षक आमदार यांचा जालना येथे भव्य सत्कार



***छायाचित्र:-*** *जालना येथील शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी शिक्षक आमदार विक्रमजी काळेसाहेब आणि लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांचा सत्कार करताना दिसत आहे.*

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** मराठवाड्याचे लोकप्रिय तथा लढवय्ये शिक्षक आमदार विक्रमजी वसंतराव काळेसाहेब आणि बालभारतीच्या इयत्ता चौथीच्या " कौतुकाची थाप " या पाठाचे लेखक तथा प्रसिद्ध कवी अय्युब पठाण लोहगावकर यांच्या पाठाच्या प्रभावी सादरीकरणाने जालना येथील शालेय विद्यार्थी आणि शिक्षक शिक्षिका व कार्यकर्ते तसेच शिक्षक आमदार विक्रमजी काळे साहेबांचे विचार ऐकून आणि प्रत्यक्ष लेखकाला पाहून विद्यार्थी हे अगदी भारावून गेले होते. म्हणून तेथील कार्यकर्ते यांनी शिक्षक आमदार विक्रमजी काळेसर आणि "कौतुकाची थाप" इयत्ता चौथीच्या पाठाचे लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांच्या गळयात पुष्पहार घालून मोठ्या आनंदाने जालना येथील शिक्षकांनी तथा कार्यकर्त्यांनी भव्य सत्कार केलेला आहे. याप्रसंगी शांतिनिकेने निकेतन विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष भास्करराव आंबेकर आणि भिलदरी शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. सुखदेव मांटे तसेच छत्रपती संभाजीनगर येथील राष्ट्रवादी शिक्षक संघाचे माध्यमिक व प्राथमिक जिल्हाध्यक्ष तथा कार्यकर्ते मनोज खुटे, प्रदीप विखे, वाहेद शेख, मुदस्सर पठाण, प्रथमेश सारंगधरे, आणि जालना येथील शांतिनिकेतन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री गाढवेसर आणि शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका विद्यार्थी व पालक वर्ग मोठ्या संख्येने या सत्काराच्या कार्यक्रमाला उपस्थित होते.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २२ जुलै २०२६


## दोन दिवशीय नेतृत्व विकास शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद



**जालना :** महिको रिसर्च फाउंडेशन ट्रस्ट संचालित बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना येथे एम. आर. पै फाउंडेशन, मुंबई, फोरम ऑफ फ्री एंटरप्राइझ, मुंबई आणि बद्रीनारायण बारवाले महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवशीय नेतृत्व विकास प्रशिक्षण शिबिरास मंगळवार, दि. 21 जुलै रोजी उत्साहात प्रारंभ झाला. हा उपक्रम 21 व 22 जुलै 2026 या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. सचिन कामत व श्री. सुधीर पै यांनी विद्यार्थ्यांना नेतृत्व, ध्येय निश्चिती, प्रभावी संवादकौशल्य, सवयींचे व्यवस्थापन, निर्णयक्षमता आणि समस्या निराकरण या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. उद्घाटनानंतर कार्यक्रमपत्रिकेनुसार विद्यार्थ्यांना दोन गटांत विभागून विविध सत्रांचे आयोजन करण्यात आले.अध्यक्षीय समारोपात प्रभारी प्राचार्य डॉ. भूषण नाफडे यांनी विद्यार्थ्यांना शिबिरात मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग आपल्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी, नेतृत्वगुण वृद्धीसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी करावा, असे आवाहन केले.या शिबिरात महाविद्यालयातील बी.ए., बी.एस्सी., बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी, बी.सी.ए. द्वितीय व तृतीय वर्षातील व एम.एस्सी. एकूण 60 विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी विविध सत्रांमध्ये सक्रिय सहभाग घेत नेतृत्वगुण, संवादकौशल्य व व्यक्तिमत्त्व विकासाच्या विविध पैलूंचा अनुभव घेतला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संदीप पाटील यांनी केले.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. डॉ. निलेश बर्डे, प्रा. डॉ. रवींद्र शिंपी, प्रा. डॉ. रामेश्वर मस्के, प्रा. डॉ. रवींद्र भोरे, श्री. अनिल जाधव, श्री. सतीश सोनवणे आणि श्री. सुंदर वायाळ यांनी विशेष परिश्रम घेतले.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103


## राज्यातील १७७ आकांक्षित तालुक्यांमध्ये एक वर्षाकरिता आकांक्षित तालुका कार्यक्रम

**बीड (भगवंत पाळवदे) :** राज्यातील १७७ आकांक्षित तालुक्यांमध्ये एक वर्षाकरिता आकांक्षित तालुका कार्यक्रमराज्यातील १७७ आकांक्षित तालुक्यांमध्ये प्रायोगिक तत्वावर सन २०२६-२७ साठी आकांक्षित तालुका कार्यक्रम राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. नीति आयोगाने देशातील दुर्लक्षित व मागासलेल्या ११२ जिल्ह्यांमध्ये आकांक्षित जिल्हा कार्यक्रम व ५०० अल्प विकसित तालुक्यांमध्ये आकांक्षित तालुका कार्यक्रम सुरू केलेला आहे. त्यामध्ये राज्यातील ४ जिल्हे व २७ तालुक्यांचा समावेश आहे. या तालुक्यांचे आरोग्य व पोषण, शिक्षण, कृषि आणि संलग्न सेवा, मूलभूत पायाभूत सुविधा, सामाजिक विकास क्षेत्रातील ३९ निर्देशांक यांच्या आधारे कामगिरीचे मूल्यमापन केले जाते व त्यासाठी आयोगाकडून विशेष निधी दिला जातो. याच धर्तीवर महाराष्ट्राने संतुलित, सर्वांगीण व गतिमान विकासासाठी आकांक्षित जिल्हा व तालुका कार्यक्रमाचा विस्तार केला असून त्यांमध्ये गडचिरोली, नंदूरबार, धाराशिव, वाशिम, हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे व परभणी या १० जिल्ह्यांची व एकूण १७७ तालुक्यांची विस्तारित आकांक्षित जिल्हे व तालुके म्हणून निवड केली आहे. या नव्याने निवड करण्यात आलेल्या १७७ आकांक्षित तालुक्यांमध्ये सन २०२६-२७ साठी आकांक्षित तालुका कार्यक्रम राबविण्यास मान्यता देण्यात आली. या तालुक्यांना या वर्षासाठी ५ कोटी रूपयांचा निधी देण्यात येईल. या वर्षात सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तालुक्यांना सन २०२७-२८ मध्ये अतिरिक्त प्रोत्साहन निधी देण्यात येईल. हा निधी पुरस्कार स्वरूपात पहिल्या पुरस्कारासाठी १० कोटी, दुसऱ्या पुरस्कारासाठी ८ कोटी, तिसरा-६ कोटी, चौथा-४ कोटी आणि पाचवा पुरस्कार २ कोटी रूपयांचा असेल. याशिवाय सर्व क्षेत्रातील एकत्रित कामगिरीच्या आधारे पुरस्कार दिला जाईल. यात पहिला पुरस्कार २१ कोटी, दुसरा पुरस्कार-१५ कोटी आणि तिसरा पुरस्कार-११ कोटी रूपयांचा असेल. या तालुक्यांच्या मूल्यांकनासाठी राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय अशा संनियंत्रण समित्या स्थापन केल्या जातील.--00-- (कृषि विभाग) नागपूरच्या काटोल येथे शासकीय उद्यानविद्या महाविद्यालयनागपूर जिल्ह्यातील काटोल येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांच्याशी संलग्न शासकीय उद्यानविद्या महाविद्यालय स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. नागपूर व अमरावती विभागातील ११ जिल्ह्यांमध्ये संत्रा, मोसंबी, आंबा, लिंबू, पेरू इत्यादी व मुख्य फळ पिकाव्यतिरिक्त कमी पाण्यावर तग धरणारी आवळा, सिताफळ या फळपिकांचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचबरोबर नागपूर जिल्ह्यातील फळे, भाजीपाला व फुलशेतीची विविधता बघता उद्यानविद्या महाविद्यालयाची आवश्यकता आहे. या महाविद्यालयामध्ये फळे, भाजीपाला, फुले तसेच, प्रक्रिया व मूल्यवर्धन या संबंधीच्या अभ्यासक्रमांचा समावेश असल्याने त्यासंबंधीच्या अभ्यास व संशोधनाला चालना मिळणार आहे. दरवर्षी या महाविद्यालयात १२० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. या महाविद्यालयासाठी शिक्षकवर्गीय २९ पदे आणि शिक्षकेतर नियमित २२ पदे अशी एकूण ५१ नियमित पदे मंजूर करण्यात आली आहेत. त्याचबरोबर शिक्षकवर्गीय (गट अ) (०५) आणि शिक्षकेतर (गट क) (०८) व (गट ड) (२२) ची पदे आवश्यकतेनुसार कंत्राटी स्वरुपात भरण्यास मान्यता देण्यात आली आहे. या पदांसाठी आवश्यक वेतन व अनुषंगिक खर्चासाठी १२२ कोटी ३२ लाख रूपयांच्या तरतुदीस मान्यता देण्यात आली. --00-- (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग) एनडीआरएफला पुणे जिल्ह्यातील मौजे सदुंबरे येथे तीन हेक्टर जमीनराष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल- एनडीआरएफला पुणे जिल्ह्यातील मौजे सदुंबरे (ता.मावळ) येथील तीन हेक्टर जमीन देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. मौजे सदुंबरे येथील गायरानातील तीन हेक्टर जमीन एनडीआरएफला बाजारभावाने देण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यावर या संस्थेने जनहित तथा राष्ट्रीय महत्त्व या कारणास्तव संस्थेस ही जमीन विनामूल्य मिळावी, अशी मागणी केली होती. या जमिनीवर एनडीआरएफचा कायमस्वरूपी तळ उभारण्यात येणार आहे. जिथे आपत्ती व्यवस्थापनाच्या विविध प्रशिक्षणांसह, विविध स्वरूपाच्या आपत्तींवर मात करण्यासाठीची कृतीदले तैनात राहणार आहेत. यामुळे राज्यात आपत्कालीन स्थितीत उपाययोजना करता येणार. या दृष्टीने देशातील एकमेव अशा समर्पित नागरी दल म्हणून एनडीआरएफला ही जागा विनामूल्य भोगवटादार वर्ग-२ म्हणून मान्यता देण्यात येणार आहे.--00-- (महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग)भारतीय श्रीगुरूदेव सेवामंडळ यांच्या नागपूर येथील जमीन भाडेपट्ट्यावरील मुद्रांक शुल्क माफमोझरी येथील अखिल भारतीय श्रीगुरूदेव सेवामंडळ यांच्या नागपूरमधील सुभाष रोड जागेच्या भाडेपट्ट्याच्या नुतनीकरणावरील मुद्रांक शुल्क माफ करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. मोझरी येथील अखिल भारतीय श्रीगुरूदेव सेवामंडळ ही सार्वजनिक धर्मादाय संस्था आहे. ही संस्था राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांचा प्रसार, सामाजिक प्रबोधन, ग्रामविकास, व्यसनमुक्ती, सर्वधर्मसमभाव, राष्ट्रभक्ती तसेच विविध जनकल्याणकारी उपक्रम राबवीत असते. या संस्थेला नागपूर मधील सुभाष रोड येथील १८ हजार ३४० चौ.फूट जागा शासनाने १९५४ मध्ये भाडेपट्ट्यावर उपलब्ध करून दिलेली आहे. या संस्थेने विनंती केल्यानुसार भाडेपट्ट्याच्या नुतनीकरणावरील मुद्रांक शुल्क लोकहितास्तव माफ करण्याचा प्रस्ताव होता. त्यास आज मान्यता देण्यात आली.--00-- (सामान्य प्रशासन विभाग)लोक आयुक्त कार्यालयातील १४३ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यतालोक आयुक्त कार्यालयातील १४३ पदांच्या सुधारित आकृतीबंधास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. लोक आयुक्त व उपलोक आयुक्त कार्यालयाची स्थापना करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या दोन्ही कार्यालयांसाठी यापूर्वी ८७ पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला होता. आता राज्य शासनाने केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र लोक आयुक्त अधिनियम २०२३ लागू केला आहे. या अधिनियमानुसार लोक आयुक्त संस्थेतील सदस्यांमध्ये वाढ झाली असून त्यांच्या अधिकार क्षेत्रातही वाढ झाली आहे. त्यामुळे या कार्यालयाला प्रभावी अंमलबजावणीसाठी अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता निर्माण झाली. त्यानुसार सध्याची मंजूर पदे ८७ अधिकची ५६ पदे (३१ नियमित, २३ बाह्ययंत्रणेद्वारे आणि २ माहिती तंत्रज्ञान कर्मचारी) अशा एकूण १४३ पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात आली